**मुंबई विद्यापीठ**

क्र.वि.क./ ३० /२००८

परिपत्रक.

विषय - शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या बिंदुनामावल्या अद्ययावत करुन तपासणी करुन घेण्याबाबत.

सर्व अध्यक्ष/ सचिव/ प्राचार्य/ संचालक, संलग्नित अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रीकी, व्यवस्थापन संस्था औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये (अल्पसंख्यांक महाविद्यालये वगळुन) यांना कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरताना शासनाने निर्गमित केलेले शासननिर्णय दिनांक १८ ऑक्टोबर १९९७ व २९ मार्च १९९७ मधिल तरतुदीनुसार बिंदुनामावल्या अद्ययावत करुन विद्यापीठाच्या विशेष कक्षाकडुन तपासुन घ्याव्यात व त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश निर्गमीत केलेले आहेत.

तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे सरळसेवा तसेच पदोन्नतीने भरताना आरक्षणाबाबतचे निकष लावण्यासाठी विशेष कक्षाची मान्यता घेणे आवश्यक असुन शासनाच्या सदरच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे असे विद्यापीठ क्र.बीसीसी./५६/७४/१९९८ दिनांक १० मार्च १९९८ च्या परिपत्रकान्वये कळविले आहे.

बहुतेक, महाविद्यालये पदे भरताना शासन निर्णयाचे तसेच विद्यापीठ परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे तसेच त्याबाबत तक्रारीही प्राप्त झालेल्या आहेत. तेव्हा, या परिपत्रकाव्दारे आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील पदे भरण्यापुर्वी आरक्षणचे निकष लावण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या बिंदुनामावल्या ३१ डिसेंबर २००७ पर्यंत अद्ययावत करुन या कक्षाकडुन तपासुन पदे भरण्याची कार्यवाही करावी. जेणे करुन आरक्षण धोरणाची आमलबजावणी करुन विद्यापीठाला शासनास अहवाल सादर करणे सोईस्कर होईल.

दिनांक :- २५ जानेवारी २००८
स्थळ :- मुंबई.

प्राचार्य के. व्यंकटरमणी
(प्रभारी कुलसचिव)

क्र.वि.क./३०-अ /२००८ दिनांक २५ जानेवारी २००८

सर्व अध्यक्ष/ सचिव/ प्राचार्य/ संचालक, संलग्नित अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रीकी, व्यवस्थापन संस्था औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये (अल्पसंख्यांक महाविद्यालये वगळुन)

२) सहसंचालक (उच्च शिक्षण) मुंबई विभाग, मुंबई, संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यापुर्वी व तत्संबंधी कार्यवाही करण्यापुर्वी विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाकडुन बिंदुनामावल्या तपासुन घेण्याबाबतच्या सुचना दयाव्यात व विद्यापीठाच्या विशेष कक्षाने दर्शविलेल्या अनुशेषाप्रमाणे पदे भरण्याची मान्यता दयावी.

प्राचार्य के. व्यंकटरमणी
(प्रभारी कुलसचिव)